नॅक अ दर्जा प्राप्त

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र आणि
## राष्ट्रीय सेवा योजना पदव्युत्तर विभाग

यांच्या संयुक्त विद्यमाने

# सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त
# राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा

**दिनांक. ०४.०१.२०२१, वेळ : सकाळी १०.३० वा.**

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक - रु. ३०००/- | द्वितीय पारितोषिक रु. २०००/- |
| तृतीय पारितोषिक - रु. १०००/- | उत्तेजनार्थ पारितोषिक रु. ५००/- |

कोरोना नामक वैश्विक महामारीने संपूर्ण जगात अस्थिरतेचे वातावरण निर्माण केले आहे. जवळपास २०२० हे संपूर्ण वर्ष या महामारीचा सामना करत गेले. हा साथरोग अधिक पसरु नये म्हणून जगभरात लॉकडाऊनचा पर्याय अवलंबिण्यात आला. भारतही त्यास अपवाद नाही. लॉकडाऊन या शब्दाने व त्याच्या अंमलबजावणीने सर्वसामान्य जनजीवन पार कोलमडून गेले. जीवनावश्यक व्यवहार सोडले तर संपूर्ण आर्थिक व्यवहार ठप्प झाले. लोकांचे रोजगार गेले, बेरोजगारी वाढली, स्थलांतर मोठ्या प्रमाणात झाले, आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. लॉकडाऊनच्या काळात व लॉकडाऊननंतर गरीब, मध्यमवर्ग आणि स्त्रिया कोरोनामय वातावरणात जगताना व कोरोनामुळे बिघडलेल्या देशाच्या आर्थिक घडित सर्वात अधिक होरपळले गेले. स्त्रियांचा रोजगार, स्थलांतर, बेरोजगारी, आरोग्य, ओल्या दुष्काळाचे नैसर्गिक संकट, स्त्रियांवर वाढत असलेल्या हिंसा, ऑनलाईन शिक्षणाचे प्रश्न हे आणि असे अनेक प्रश्न ऐरणीवर आले.

कोरोना काळात अभ्यासाची महत्वाची पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य शिक्षण घेत असलेल्या मुख्य संस्थांमध्ये सोडून गावी गेलेले विद्यार्थी, परीक्षांची अनिश्चितता, कोरोना काळात घरातील आर्थिक चणचण, अनेकांच्या हुकलेल्या नोकरीच्या संधी तसेच अचानकपणे सुरु झालेली ऑनलाईन शिक्षणप्रणाली, ना स्मार्टफोन, ना त्यासाठी आवश्यक कंपनीचे नेटवर्क...; अशा अवस्थेत अनेक विद्यार्थ्यांची कुचंबना झाली. तसेच अनेक मुलामुलींची इच्छा नसताना शिक्षण अर्धवट सोडून 'उरकून टाकावे' या भावनेने लग्न लावून दिल्या गेले. या सबंध पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील कोरोना काळातील भावना, अनुभव व भविष्यातील परिणाम यावर आपले विचार व्यक्त करावे या दृष्टिकोनातून ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ द्वारा राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रियपणे आपला सहभाग नोंदवावा.

## वक्तृत्व स्पर्धेचे विषय :

१. कोरोना आणि शिक्षणाची कोंडी
२. लॉकडाऊनमध्ये अडकलेली/ला मी
३. ऑनलाईन शिक्षण : संधी आणि आव्हाने
४. कोरोना आणि भारतीय आरोग्यव्यवस्थेची सक्षमता
५. कोरोना आणि सामाजिक-आर्थिक दरी
६. कोविडजन्य परिस्थिती आणि विधवा, परित्यक्त्या व एकल स्त्रिया
७. कोरोनोत्तर समाज आणि रोजगार संधींचा संकोच

## स्पर्धेचे नियम :

१. https://forms.gle/xBt6qPV1dpxSUzm66 या गुगलफॉर्म लिंकवर दि.३१.१२.२०२० रोजीपर्यंत ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे लागेल. रजिस्ट्रेशनवेळी व्हाट्सअप क्रमांक नोंदवावा.
२. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी/विद्यार्थिनी या स्पर्धेत सहभाग घेवू शकतात.
३. ऑनलाईन गुगल मिट लिंक एकदिवस पुर्वी रजिस्ट्रेशन केलेल्या व्हाट्सअप क्रमांकावर पाठविली जाईल. रजिस्ट्रेशन केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्मार्टफोनमध्ये गुगल मिट हे ॲप्लिकेशन डाऊनलोड करुन ठेवावे. स्पर्धा सकाळी ठिक १०.३० वा. सुरु होईल. स्पर्धकांनी १५ मिनीटांआधी मिटिंग जॉईन करावी.
४. स्पर्धेदरम्यान स्पर्धक विद्यार्थ्यांना व्हिडीओ चालू ठेवणे अनिवार्य आहे.
५. स्पर्धेसाठी ५ + २ मिनिटे वेळ देण्यात येईल.
६. स्पर्धेसाठी दिलेल्या विषयांपैकीच एक विषय निवडावा. अन्य विषय निवडता येणार नाही. विजेते विद्यार्थी निवडण्याचा अंतिम अधिकार परीक्षकांचा असेल.
७. सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांना डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येतील.

### विनीत

डॉ. सविता बहिरट
समन्वयक
ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र
मो. 8605495760

डॉ. निर्मला जाधव
संचालक
ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

### संपर्कासाठी पत्ता :

संचालक, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र
विद्यापीठ मध्यवर्ती ग्रंथालयाशेजारी (ज्ञानस्त्रोत केंद्र)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद- ४३१००४
**E-mail:** event.tswsc@gmail.com